कमॉडिटी ऑप्शन्स

प्रायमर

MCX
METAL & ENERGY
Trade with Trust

MCX INVESTOR (CLIENT) PROTECTION FUND

तुम्हाला माहीत आहे का?

ऑप्शन्स...

- हे प्राईस इन्श्युरन्ससारखे असतात आणि म्हणून हेजर्ससाठी उपयुक्त असतात.
- केवळ एकदा शुल्क / प्रिमियम भरून खरेदी करू शकता.
- खरेदीदारांकडे दैनंदिन मार्जिन कॉल नसतात.
- खरेदीदारांची कमाल जोखीम ही भरलेल्या प्रिमियमपुरती मर्यादित असते.
- किमतीमध्ये झालेल्या अनुकूल हालचालीचा लाभ बायर घेऊ शकतात.

This booklet is not intended as professional counsel or investment advice, and is not to be used as such. While the exchange has made every effort to assure the accuracy, correctness and reliability of the information contained herein, any affirmation of fact in the booklet shall not create an express or implied warranty that it is correct. This booklet is made available on the condition that errors or omissions shall not be made the basis for any claims, demands or cause of action. MCX shall also not be liable for any damage or loss of any kind, howsoever caused as a result (direct or indirect) of the use of the information or data in this booklet .

ऑप्शन्स समजून घ्या

ऑप्शन्स कॉन्ट्रॅक्ट म्हणजे काय?

ऑप्शन्स हे डेरिव्हेटिव्ह्ज लिखिते असतात जे बायरला एका विशिष्ट दिवशी किंवा त्या आधी एका विशिष्ट किमतीला अंडरलाईंग ॲसेट विकण्याचा किंवा विकत घेण्याचा हक्क असतो, पण दायित्व नसते.

ऑप्शन्सच्या अंडरलाईंगमध्ये काय असू शकते?

ऑप्शन्स कंत्राटात इक्विटी, कमॉडिटी, फॉरेन एक्स्चेंज, फ्युचर्स कॉन्ट्रॅक्ट्स, इंटरेस्ट रेट्स, रिअल इस्टेट किंवा इतर कोणतीही मत्ता / लिखित असू शकते. उदा. सोन्याचे फ्युचर्स कॉन्ट्रॅक्ट सोन्याच्या ऑप्शन कॉन्ट्रॅक्टसाठी अंडरलाईंग असू शकते.

ऑप्शन्सची वैशिष्ये काय आहेत?

- ऑप्शन्समध्ये बायरला अंडरलाईंगची खरेदी किंवा विक्री करण्याचा अधिकार असतो, पण दायित्व नसते.
- अंडरलाईंग साठी भविष्यातील खरेदी किंवा विक्री किंमत 'लॉक इन' करता येते.
- ऑप्शन्स एक्स्चेंज–ट्रेडेड किंवा ओव्हर द काउंटर (OTC) असू शकतात.



ऑप्शन्स समजून घ्या

समजा, मॅथ्युला अब्दुलकडून एका महिन्याने कमॉडिटी विकत घ्यायची आहे, पण त्याची किंमत आजच 'लॉक इन' करायची आहे. वाटाघाटींनंतर मॅथ्यूने अब्दुलशी ऑप्शन्स करार केला. या कारारनुसार मॅथ्युला अब्दुलकडून एक महिन्याने कमॉडिटी ₹10 लाख किमतीला घेण्याचा हक्क मिळाला. या ऑप्शनची अंमलबजावणी करण्यासाठी मॅथ्युने अब्दुलला ₹10 हजार एवढी नाममात्र रक्कम अदा केली. एका महिन्यानंतर खालीलपैकी दोन प्रकारची परिस्थिती उद्भवू शकते:

1. कमॉडिटीच्या किमतीत वाढ झाली

सध्याची किंमत जास्त असल्यामुळे मॅथ्युने करारानुसार ₹10 लाख देऊन अब्दुलकडून कमॉडिटी विकत घेण्याच्या ऑप्शनची अंमलबजावणी करण्यास प्राधान्य दिले.

2. कमॉडिटीची किंमत कमी झाली

कमॉडिटीची किंमत कमी झाल्यामुळे कमॉडिटीची खरेदी करारााबाहेर करणे मॅथ्युसाठी फायदेशीर ठरेल, म्हणून तो ऑप्शनची अंमलबजावणी करणार नाही आणि कमॉडिटी बाहेरून विकत घेऊ शकेल. या व्यवहारात मॅथ्युचे कमाल नुकसान ₹10 हजार असेल, जे त्याने ऑप्शन करार करताना अब्दुलला अदा केले होते.

नोट: मॅथ्युला अब्दुलकडून खरेदी करण्याचा हक्क आहे पण बंधन नाही. दुसऱ्या बाजूला, मॅथ्युने ऑप्शनची अंमलबजावणी केली तर अब्दुलला मॅथ्युला विक्री करणे बंधनकारक आहे .

ऑप्शन्स समजून घ्या





बाय / लाँग म्हणजे कमॉडिटी ऑप्शन्स कॉन्ट्रॅक्ट खरेदी करणे. जी व्यक्ती ऑप्शन खरेदी करते ती ऑप्शन बायर / होल्डर असते.

ऑप्शन कॉन्ट्रॅक्ट वैध असण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत

या किमतीला अंडरलायिंग (कमॉडिटी फ्युचर्स कॉन्ट्रॅक्ट) विकत घेतले किंवा विकले जाऊ शकते त्या किमतीला स्टाइक प्राईस म्हणतात.

ऑप्शन कॉन्ट्रॅक्ट विकत घेण्यासाठी ऑप्शन बायर ऑप्शन सेलरला जी किंमत अदा करतो त्याला प्रिमियम म्हणतात.



सेल / शॉर्ट म्हणजे कमॉडिटी ऑप्शन्स कॉन्ट्रॅक्ट विकणे. ऑप्शन विकणाऱ्याला ऑप्शन रायटर / सेलर म्हणतात.

ओपन इंटरेस्ट: कोणत्याही वेळी अस्तित्वात असलेले ओपन किंवा ऑउटस्टँडिंग (क्लोज्ड किंवा डीलिव्हर्ड नाही) ऑप्शन्स कॉन्ट्रॅक्ट.

एक्सरसाईझ: अंडरलाईंग डिलिव्हर करण्याचा / डिलिव्हरी घेण्याचा ऑप्शन बायरचा निर्णय. केवळ बायरलाच ऑप्शनची अंमलबजावणी (एक्सरसाईझ) करण्याचा पर्याय उपलब्ध असतो.

असाइनमेंट: जेव्हा ऑप्शन होल्डर ऑप्शनची अंमलबजावणी करतो, तेव्हा सेलर असाइन केला जातो, ज्याला स्ट्राइक प्राईसला अंडरलाईंग विकत घेणे / विकणे बंधनकारक असते.

ऑप्शन्सची विभागणी कशी करतात

अ. होल्डरच्या हक्कांवर आधारीत



कॉल ऑप्शन

कॉल ऑप्शनमुळे ऑप्शन बायरला (होल्डर) अंतिम तारखेला किंवा त्या आधी पूर्वनिर्धारित केलेल्या किमतीला अंडरलाईंग (उदा. कमॉडिटी फ्युरर्स कॉन्ट्रॅक्ट) खरेदी करण्याचा हक्क प्राप्त होतो.

उदा: **कॉल ऑप्शन विकत घेणे – वाढणाऱ्या किमतीची जोखीम टाळण्यासाठी (हेज)**

- 25 ऑक्टोबर रोजी सोनार एमसीएक्स सोने कॉल ऑप्शन ऑन फ्युचर्स विकत घेतो
- अंडरलाईंग: एमसीएक्स सोने डिसेंबर फ्युचर्स कॉन्ट्रॅक्ट
- ऑप्शन समाप्तीची तारीख: 28 नोव्हेंबर
- स्ट्राइक प्राईस: ₹30,000
- ऑप्शन कॉन्ट्रॅक्ट: एमसीएक्स सोने फ्युचर्स ऑप्शनच्या कालावधी समाप्तीपर्यंत ₹30,000 या किमतीला विकत घेण्याचा हक्क.

या हक्काची अंमलबजावणी करणे मौल्यवान कधी ठरेल?

- जेव्हा ऑप्शन समाप्ती कालावधीच्या दिवशी अंडरलाईंग सोन्याच्या फ्युचर्सची ₹30,000 हून अधिक असेल.
- सोन्याच्या फ्युचर्सची किंमत ऑप्शन कालावधीच्या सामाप्तीच्या वेळी ₹30,000 हून खाली आली असेल तर कॉल ऑप्शन बायर त्याचा ऑप्शन रद्द करू शकतो कारण त्याला अंडरलाईंग सोन्याचे फ्युचर्स कॉन्ट्रॅक्ट खरेदी करणे बंधनकारक नाही.

ऑप्शन्सची विभागणी कशी करतात

A. BASED ON RIGHT OF HOLDER

पुट ऑप्शन

पुट ऑप्शनमुळे बायरलाच (होल्डर) अंडरलाईंग (उदा. कमॉडिटी फ्युचर्स कॉन्ट्रॅक्ट) निश्चित किमतीला समाप्ती तारखेच्या दिवशी किंवा त्या आधी विकण्याचा हक्क असतो.

उदाहरण: **पुट ऑप्शन विकत घेणे – घटणाऱ्या किमतीची जोखीम टाळणे (हेज)**

- 25 ऑगस्ट रोजी कापूस शेतकऱ्याने एमसीएक्स कापूस पुट ऑप्शन ऑन फ्युचर्स विकत घेतला
- अंडरलाईंग: एमसीएक्स कापूस नोव्हेंबर फ्युचर्स कॉन्ट्रॅक्ट
- ऑप्शन समाप्तीची तारीख: 21 नोव्हेंबर
- स्ट्राइक प्राईस: ₹20,000
- ऑप्शन कॉन्ट्रॅक्ट: अंडरलाईंग एमसीएक्स कापूस फ्युचर्स ऑप्शन कॉन्ट्रॅक्टच्या समाप्तीच्या तारखेनंतर ₹20,000 या किमतीला विकण्याचा हक्क.



ही अंमलबजावणी फायदेशीर कधी राहील?

- अंडरलाईंग कॉटन फ्युचर्सची किंमत ₹20,000 च्या खाली गेली तरच.
- जर कापसाच्या फ्युचर्सची किंमत ₹20,000च्या वर गेली तर पुट ऑप्शन बायरवर अंडरलाईंगची विक्री करणे बंधनकारक नसते आणि त्याचा ऑप्शन काहीच प्रक्रिया न घडता रद्द करता शकतो.

ब. अंमलबजावणीवर आधारीत

- अमेरिकन: अमेरिकन स्टाईल ऑप्शन कॉन्ट्रॅक्टमध्ये ऑप्शनचा बायर ऑप्शन कॉन्ट्रॅक्टच्या खरेदीची तारीख आणि समाप्तीची तारीख या दरम्यान कधीही त्याच्या ऑप्शन कॉन्ट्रॅक्टची अंमलबजावणी करू शकतो.

  गुंतवणूकदारासाठी अधिक लवचिकता उपलब्ध करून देत असल्यामुळे युरोपियन स्टाईल ऑप्शनपेक्षा प्रिमियम जास्त असू शकतो.

- युरोपियन: युरोपियन स्टाईल ऑप्शन कॉन्ट्रॅक्टमध्ये, ऑप्शनचा बायर केवळ कॉन्ट्रॅक्टच्या समाप्तीच्या तारखेलाच त्याच्या ऑप्शनची अंमलबजावणी करू शकतो.

  अमेरिकन स्टाईल ऑप्शनसारखी लवकचिकता या स्टाईलमध्ये मिळत नाही.

सेबीच्या परिपत्रकानुसार **कमॉडिटी फ्युरचरवरील ऑप्शन्स – उत्पादन रचना आणि जोखीम व्यवस्थापन चौकट,** 13 जून 2017 पासून कमॉडिटी ऑप्शन्सची सुरुवात युरोपियन स्टाईलने असेल.

ऑप्शन्स बाजारपेठेतील सहभागी आणि त्यांचे पे-ऑफ

सहभागी	नफा (संभाव्य क्षमता)	नुकसान (संभाव्य क्षमता)
कॉल होल्डर/ बायर	अमर्यादित (स्ट्राईक प्राईसच्या वर वाढ झालेल्या किमतीपर्यंत)	मर्यादित (जेवढा प्रिमियम भरू तेवढा)
पुट होल्डर/ बायर	व्यावहारिकदृष्ट्या अमर्यादित (अंडरलाईंगची किंमत शून्य होईपर्यंत)	मर्यादित (जेवढा प्रिमियम भरू तेवढा)
कॉल रायटर/ सेलर	मर्यादित (मिळालेल्या प्रिमियमच्या रकमेएवढा)	अमर्यादित (स्ट्राईक प्राईसच्या वर वाढ झालेल्या किमतीपर्यंत)
पुट रायटर/ सेलर	मर्यादित (मिळालेल्या प्रिमियमच्या रकमेएवढा)	व्यावहारिकदृष्ट्या अमर्यादित (अंडरलाईंगची किंमत शून्य होईपर्यंत)

ऑप्शनधारकाची जोखीम मर्यादित असते (ऑप्शन प्रिमियमचे नुकसान) आणि व्यावहारिकदृष्ट्या फायदा मिळविण्याची अमर्यादित शक्यता असते; तर दुसरीकडे **ऑप्शन रायटरला** मात्र अमर्यादित जोखीम पत्करावी लागते आणि मर्यादित लाभ होतो (ऑप्शन प्रिमियमएवढा).

ऑप्शन्सचा वापर का करावा?

हेजिंग: ऑप्शनधारकाला कोणत्याही दायित्वाशिवाय अंडरलाइंगची किंमत लॉक–इन करता येते आणि त्यामुळे अननुकूल किमतीमुळे निर्माण होणारी जोखीम टाळता येऊ शकते.

याचे कार्य विमा पॉलिसीप्रमाणेच असते आणि प्रिमियम भरून किमतीमधील विपरीत चढ उतारांपासून संरक्षण मिळते.

शेतकरी, घसरणाऱ्या किमतीपासून बचाव करण्यासाठी ऑप्शन म्हणजेच 'पुट ऑप्शन' कॉन्ट्रॅक्ट विकत घेऊन संरक्षण करू शकतो. यामुळे तो आपले उत्पादन एक निश्चित पूर्वनिर्धारित किमतीला विकू शकतो. त्या किमतीला त्याचे उत्पादन विकणे हा त्याचा हक्क आहे, पण दायित्व नाही.

एक गठ्ठा कापूस ₹१८,००० किमतीला विक्री करण्याचा कापूस पुट ऑप्शन विकत घेतल्यामुळे माझ्या कापासापासून मिळणारे किमान उत्पन्न ₹१८००० प्रति गठ्ठा एवढे असेल.



ऑप्शन्सचा वापर का करावा?

गुंतवणूक: अंडरलाइंगच्या किमतींचा अंदाज बांधून गुंतवणूकदार ऑप्शन व्यापारात प्रवेश करू शकतात. एक फायद्याचे साधन म्हणून प्रत्यक्ष अंडरलाईंगच्या तुलनेत ऑप्शन्स स्वस्त असल्यामुळे ते वृद्धी देऊ शकतात.

ऑप्शन विकत घेण्यासाठीची किंमत एकरकमी दिल्याने बायरला त्या व्यवहाराच्या संभाव्य उणी बाजू आधीच समजते.



ऑप्शन्स आणि फ्युचर्समध्ये फरक काय?



ऑप्शन व्यवहारातील 'मनी–नेस' म्हणजे काय?

ऑप्शनच्या अंमलबजाणीने फायदा होणार की नाही हे बायरला मनीनेसमुळे समजू शकते.

इन–द–मनी (आयटीएम): (नफा)

कॉल ऑप्शन – अंडरलाईंग प्राईस स्ट्राइक प्राईसपेक्षा जास्त असते.

पुट ऑप्शन – अंडरलाईंग प्राईस स्ट्राइकपेक्षा कमी असते

आउट ऑफ द मनी (ओटीएम): (नुकसान)

कॉल ऑप्शन – अंडरलाईंग प्राईस स्ट्राइक प्राईसपेक्षा कमी असते.

पुट ऑप्शन – अंडरलाईंग प्राईस स्ट्राइक प्राईसपेक्षा जास्त असते.

ॲट द मनी (एटीएम): (ना नफा – ना तोटा)

अंडरलाईंग प्राईस आणि स्ट्राईक प्राईस सारखीच असते. सेबीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अंडरलाईंग कम्युनिटी फ्युचर्सच्या कॉमन ऑप्शन सीरिजची स्ट्राइक प्राईस डेली सेटलमेंट प्राईसच्या (डिएसपी) जवळपास असते तेव्हा ती एटीएम ऑप्शन मालिका असते.

क्लोज टू द मनी (सीटीएम)

सेबीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार जी एटीएम ऑप्शन सीरिज 2 ऑप्शन सीरिजसह एटीएम च्या लागोलाग खालची आणि वरची स्ट्राइक प्राईस असलेली असते ती क्लोज टू द मनी (सीटीएम) ऑप्शन सीरीज असते.

जर डिएसपी ही 2 स्ट्राइक प्राईसच्या मध्ये असेल, तर डिएसपीच्या लगेच वर स्ट्राइक प्राईस असलेल्या 2 ऑप्शन सीरिज आणि डिएसपीच्या लगेच खाली स्ट्राइक प्राईस असलेल्या दोन ऑप्शन सीरिज सीटीएम सीरिज असतात.

ऑप्शनची किंमत कशी ठरवली जाते?

फ्युचर्सवरील ऑप्शनची किंमत कशी ठरवतात?

विविध प्रकारची मॉडेल वापरून ऑप्शनची किंमत ठरवतात. फ्युचर्सवरील कमॉडिटी ऑप्शनची किंमत ठरविण्याचे सर्वात लोकप्रिय मॉडेल आहे ब्लॅक–76 मॉडेल

ब्लॅक–76 मॉडेलमध्ये नमूद केले आहे की:

$$\text{Call} = e^{-rt}\,[F*N(d1) - K*N(d2)]$$
$$\text{Put} = e^{-rt}\,[K*N(-d2) - F*N(-d1)]$$

$$d1 = \frac{\ln\left(\frac{F}{K}\right) + \left(\frac{\sigma^2}{2}\right)t}{\sigma\sqrt{t}} \qquad d2 = d1 - \sigma\sqrt{t}$$

ज्यामध्ये,

F = सध्याची अंडरलाईंग फ्युचर्स प्राईस

K = ऑप्शनची स्ट्राइक प्राईस

t = ऑप्शनचा कालावधी समाप्त होईपर्यंतचा कालावधी वर्ष या परिमाणात

r = रिस्क फ्री इंटरेस्ट रेट

σ = अंडरलाईंग फ्युचर्स कॉन्ट्रॅक्टची अस्थिरता

N(.)=प्रमाणित सामान्य संचयी वितरण कार्य

ऑप्शन किमतीचे दोन घटक असतात:

इन्ट्रिन्सिक व्हॅल्यू:

ऑप्शन प्रिमियमचा हा इन–द–मनी भाग आहे. कॉल ऑप्शनसाठी हे मूल्य म्हणजे स्ट्राइक प्राईसच्या वरील अतिरिक्त फ्युचर्स प्राईस असते आणि पुट ऑप्शनसाठी हे मूल्य म्हणजे अंडरलाईंग फ्युचर्स प्राईसच्या वरील स्ट्राइक प्राईस असते.

टाईम व्हॅल्यू:

हे मूल्य म्हणजे ऑप्शन प्रिमियम आणि इन्ट्रिन्सिक व्हॅल्यू यांच्यातील फरक.

ऑप्शन्सच्या किमतीवर प्रभाव पाडणारे घटक (ब्लॅक–76 मॉडेल)

घटक	वाढ		घट	
	कॉलच्या किमतीत परिणाम	पुटच्या किमतीत परिणाम	कॉल प्राईसमध्ये परिणाम	पुट प्राईसमध्ये परिणाम
अंडरलाईंग प्राईस	↑	↓	↓	↑
कालावधी समाप्तीपर्यंत	↑	↑	↓	↓
अस्थिरता	↑	↑	↓	↓
व्याजदर	↓	↓	↑	↑
स्ट्राइक प्राईस	↓	↑	↑	↓



कमॉडिटी फ्युचर्स किमतींवर प्रभाव पाडणारे घटक

अंडरलाईंगच्या किमती म्हणजेच कमॉडिटी फ्युचर्सवर अनेक घटकांचा प्रभाव असतो. त्यांच्यापैकी काही घटक खालीलप्रमाणे:

- कमॉडिटीचा हंगाम
- पुरवठा मागणीचा समतोल
- जागतिक घटक
- धोरणांचा हस्तक्षेप
- जागतिक पातळीवरील माहितीचे प्रकाशन, उदा.
  - यू.एस. फेडरल रिझर्व्हने केलेला दर बदल
  - यू. एस. जॉब रिपोर्ट्स
  - चीनच्या विकासाची आकडेवारी
  - तेल आणि वायूच्या पुरवठ्याची पातळी इत्यादी.

ग्रीक्स म्हणजे काय?

ग्रीक्स

ग्रीक्स प्रामुख्याने ऑप्शन किमतींची संवेदनशीलता चार घटकांच्या आधारे मोजते

1. अंडरलाईंगच्या (फ्युचर्स कॉन्ट्रॅक्ट) किमतीमधील बदल, ज्याला डेल्टा (δ) असेही म्हटले जाते
2. कालावधीतील बदल, ज्याला थिटा (θ) असेही म्हटले जाते
3. अस्थिरतेमधील बदल, ज्याला व्हेगा (ν) असेही म्हणतात
4. व्याजदरातील बदल, ज्याला ऱ्ह (ρ) असेही म्हणतात.

अंडरलाईंग मत्तेच्या किमतीत होणाऱ्या बदलाच्या डेल्टाच्या संवेदनशीलतेला गॅमा (γ) म्हणतात.



कॉल ऑप्शन्स

येत्या दोन महिन्यात सोन्याची किंमत वाढेल अशी सोनलची अपेक्षा आहे.

संभाव्य दरवाढीला हेज करता यावे यासाठी ती तिने 3 महिन्यांनी कालावधी समाप्त होणारा फ्युचर्सवरील कॉल ऑप्शन मालतीकडून खरेदी केला. त्याची स्ट्राइक प्राईस ₹30,000 प्रति 10 ग्रॅम इतकी होती आणि दर 10 ग्रॅमसाठी ₹150 इतका प्रिमियम भरला.

दोन संभाव्य शक्यता:

1) **सोन्याची किंमत ₹30,000 च्या खाली जाईल:**
सोनल ऑप्शनची अंमलबजावणी करणार नाही आणि म्हणून तिने भरलेला ₹150 हा प्रिमियम हे तिचे नुकसान असेल (आलेखातील लाल भाग). हा मालतीचा फायदा असेल.

2) **सोन्याची किंमत ₹30,000 च्या वर जाईल:**
जेव्हा सोन्याची किंमत ₹30,000 पेक्षा वर जाईल, तेव्हा सोनल इन-द-मनी असेल आणि ₹30,150 (स्ट्राइक प्राईस) तिचा निव्वळ नफा होईल.

ऑप्शन बायर म्हणून तिची संभाव्य नफा मिळविण्याची संभाव्यता अमर्यादित असेल. (आलेखातील हिरवा भाग)

दुसऱ्या बाजूला मालतीला मात्र नुकसान सोसावे लागेल; सोन्याची किंमत ₹30,000च्या जितकी वर जाईल, तितके तिचे नुकसान होईल.

कॉल ऑप्शन बायर्स – पे ऑफ



पुट ऑप्शन्स

संजयकडे सोन्याच्या दागिन्यांचा साठा आहे आणि पुढील दोन महिन्यांत सोन्याची किंमत घसरेल अशी भीती त्याला वाटत आहे. या जोखमीचे व्यवस्थापन करण्यासाठी तो मनोजकडून फ्युचर्सवर ₹29000/– प्रति दहा ग्रॅम या स्ट्राईक प्राईस दराने 10 ग्रॅमसाठी ₹150 प्रिमियम देऊन गोल्ड पुट ऑप्शन विकत घेतो.

दोन संभाव्य शक्यता:

1) सोन्याची किंमत ₹29,000 च्या खाली जाईल. सोन्याची किंमत शून्य होत नाही तोपर्यंत संजयला पुट ऑप्शनसाठी पे–ऑफमध्ये झालेल्या वाढीचा फायदा मिळेल. (आलेखातील हिरवा भाग)

   त्यामुळे त्याला कमाल ₹28,850/– प्रति दहा ग्रॅम एवढा फायदा होऊ शकतो. (स्ट्राइक प्राईस वजा ऑप्शन प्रिमियम)



दुसऱ्या बाजूला मनोजचे नुकसान, सोन्याची किंमत शून्य होईपर्यंत वाढतच जाईल.

2) सोन्याची किंमत ₹29,000च्या वर गेली तर संजय ऑप्शनची अंमलबजावणी करणार नाही आणि त्याचे कमाल नुकसान प्रिमियमएवढेच म्हणजे ₹50 इतकेच असेल. हा मनोजचा फायदा असेल.

म्हणजे या दोन्ही उदाहरणांवरून हे स्पष्ट होते की, ऑप्शन बायरसाठी जास्त संभाव्य फायदे आणि किमान संभाव्य तोटे आहेत. ऑप्शन सेलरला मात्र याच्या विरुद्ध परिस्थितीला सामारे जावे लागते. अंडरलाईंगच्या किमतीच्या चढउतारामुळे त्यांच्यासाठी मर्यादित लाभ आहेत पण अमर्यादित संभाव्य तोटा आहे.

(ब्रोकरेज, टॅक्सेस इत्यादींशी संबंधित व्यवहराचा खर्च वरील उदाहरणांमध्ये धरलेला नाही.)

जगातील काही



काही लोकप्रियऑप्शन्स

स्ट्रॅडल:

- एकाच वेळी एकच अंडरलाईंग, सारख्या स्ट्राइक प्राईसला आणि कालावधी समाप्ती तारखेचे पुट आणि कॉल विकत घेणे.
- किमतीमध्ये चढ उतार अपेक्षित असताना त्याचा वापर करणे मात्र किमतीत कोणत्या दिशेने होईल हे माहीत नसणे.

स्ट्रँगल:

- एकाच वेळी एकच अंडरलाईंग आणि एक्स्पायरेशन तारीख असलेली आउट ऑफ द मनी पुट आणि आउट ऑफ द मनी कॉल विकत घेणे.
- जेव्हा अंडरलाईंग किंमत एकाच दिशेने तीव्र हालचाल करते तेव्हा याचा सर्वाधिक उपयोग होतो.

महत्त्वाचे एक्स्चेंज



मधील व्यापाराचे तंत्र

बुल कॉल स्प्रेड:

- एक अंडरलाईंग आणि कालसमाप्ती असलेल्या स्ट्राइक प्राईसला कॉल ऑप्शन खरेदी करणे आणि त्याचवेळी कॉल ऑप्शन वाढीव किमतीला विकणे.
- जेव्हा मंदीकडे कल असेल तेव्हा वापरणे.

बेअर पुट स्प्रेड:

- स्ट्राइक प्राईसला पुट ऑप्शन खरेदी करणे आणि त्याचवेळी एकच अंडरलाईंग आणि कालसमाप्ती महिना असलेल्या कमी स्ट्राईक प्राईसला विकणे
- जेव्हा आशावादी असेल तेव्हा वापर करणे.

FLEXIBILITY JUST ENTERED THE MARKET



OPTIONS ARE HERE

MCX
METAL & ENERGY
Trade with Trust

MCX INVESTOR (CLIENT) PROTECTION FUND

प्रकाशक: संशोधन विभाग, एमसीएक्स
रचना: ग्राफिक्स टीम, जनसंवाद खाते, एमसीएक्स

कॉर्पोरेट पत्ता:
मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड
एक्सचेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई 400 093, भारत.
टेलीफोन 91-22-6731 8888, सीआयएन नं. : L51909MH2002PLC135594
info@mcxindia.com, www.mcxindia.com

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज इन्व्हेस्टर (क्लायंट) प्रोटेक्शन फंड द्वारे जनहितार्थ जारी

©MCX 2017. All rights reserved. No part of this document may be reproduced, or transmitted in any form, or by any means - electronic, mechanical, photocopying, recording, scanning, or otherwise - without explicit prior permission of MCX.

Follow us @MCXIndialtd